श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई-४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028
( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

दिनांक : २ मे, २०२४

# दरपत्रके मागविण्यासंदर्भातील प्रथम मुदतवाढ सूचना

**विषय : रेलिंगचे जुने लिवरर्स् (कान) काढून नविन लिवरर्स् बसविण्यासाठी तसेच नविन रेलिंग उभारण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविणेबाबत.**

उक्त विषयास अनुसरून मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

**अटी व शर्ती :**

१. दरपत्रक सादर करताना (तांत्रिक लिफाफा व मूल्य लिफाफा) यानुसार दोन मोहोरबंद लिफाफे सादर करावेत. एकत्रित भरलेला तांत्रिक व मूल्य लिफाफा स्विकारला जाणार नाही.

२. दरपत्रक भरताना दरपत्रकातील मूल्य लिफाफा (BOQ) नमूदप्रमाणे रक्कम भरावी.

**३. तांत्रिक लिफाफ्यामध्ये अ) जी. एस. टी. नोंदणी प्रमाणपत्र ब) आयकर विवरण पत्रे – आर्थिक वर्षे सन २०२२–२३, क) २०२२–२३ चा वार्षिक उलाढालीबाबत लेखा परिक्षण अहवाल (Audited Balance sheet) ड) पॅनकार्ड इ) सन २०२२–२३ वर्षाचा ITR रिटर्न) ई) कंपनी नोंदणी दाखला ई. कागदपत्रांच्या छायांकित प्रती असणे आवश्यक आहे. अन्यथा दरपत्रकधारकाला अपात्र ठरविण्यात येईल.**

४. दरपत्रक सादर करताना कंपनीचे नाव, संपुर्ण पत्ता व भ्रमणध्वनी स्पष्टपणे नमूद करावा.

५. नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी दरपत्रकधारकाची यांची राहील.

६. गुरूवार, दि. ९ मे, २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत मोहोरबंद दरपत्रक मंदिराच्या चौथ्या मजल्यावर देखभाल व दुरूस्ती विभागात सादर करावे.

७. गुरूवार, दि. ९ मे, २०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता न्यासाच्या तिसऱ्या मजल्यावरील समिती कक्षात मोहोरबंद दरपत्रकांचे लिफाफे उघडण्यात येतील.

८. दरपत्रकात नमूद केलेल्या वर्णनानुसार साहित्य/सामानाचा वापर करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

९. रेलिंग उभारण्याकरीता वापरण्यात येणाऱ्या साहित्य/सामानाचा दर्जा उत्तम व चांगल्या प्रतीचा असावा.

१०. कामे पूर्ण केल्यानंतर आपणासोबत संयुक्तीकरित्या कामाचे मूल्यांकन करून प्रत्यक्ष केलेल्या कामानुसार आयकर (टीडीएस) कपात करून कामाची रक्कम अदा करण्यात येईल.

११. कामगार मजूर, भाडयाने आणलेली यंत्रसामग्री व इतर साहित्यांचे वेगळी अदायगी दिली जाणार नाहीत. सदर कामासाठी लावण्यात आलेल्या/नेमलेल्या कामगारांची/मजूरांची सुरक्षितता व जबाबदारी कंत्राटदारावर राहील. कामगार कायदा, मजूरी अधिनियम आणि कामगार नुकसान भरपाई अधिनियमातील तरतूदीचे पालन करणे कंत्राटदारावर बंधनकारक असेल. यासंबंधाची कोणतीही जबाबदारी न्यास स्विकारणार नाही.

१२. रेलिंग उभारण्याचे काम सुरू असताना कामामधील स्वच्छता व ईतर सर्व कामे ही कंत्राटदारामार्फतच पार पाडली जातील याची विशेष नोंद घ्यावी.

2-May-24 4:17 PM 45

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028
( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

१३. न्यासाच्या लेखी परवानगीशिवाय कोणतेही अतिरिक्त काम करण्यात येऊ नये. परवानगीशिवाय केलेल्या जादा कामाचा मोबदला आपणास देण्यात येणार नाही. तसेच दरपत्रकात नमूद दरांनुसार सर्व कामे पूर्ण करण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

१४. काम सुरू करण्यापूर्वी किंवा सुरू केल्यानंतर कोणतेही आगाऊ प्रदान केले जाणार नाही. काम पूर्ण झाल्यानंतर आपले देयक न्यासास प्राप्त झाल्यानंतर निविदेतील तरतूदीनुसार तपासणी तसेच प्रत्यक्ष मोजमापानुसार देयक आर. टी. जी. एस. मार्फत प्रदान करण्यात येईल.

१५. निकृष्ट दर्जाचे काम आढळल्यास नियमानुसार दंड आकारण्यात येईल. तसेच सदर दंडात्मक रक्कम कंत्राटदाराच्या देयकातून वसूल करण्यात येईल.

१६. दरपत्रकातील अटी–शर्ती नुसार कामासाठी नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत काळजी आपणास घेण्यात यावी. तसेच काम करताना कर्मचाऱ्यास कोणतीही अप्रीय घटना अथवा अपघात झाल्यास सदर कर्मचाऱ्यास WORKMEN'S COMPENSATION ACT, 1923 नुसार भरपाई देण्याची संपूर्ण जबाबदारी आपली राहील. यासंदर्भात न्यासाकडे कोणत्याही प्रकारची मदत देता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१७. या कामासाठी नेमणूक करण्यात येणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचा WORKMEN'S COMPENSATION INSURANCE काढणे आपणावर बंधनकारक राहील. तसेच यासंदर्भात कोणतीही घटना/समस्या उद्‌भवल्यास याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

१८. बृहन्मुबई महानगर पालिका, बृहन्मुबई विद्युतपुरवठा आणि परिवहन उपक्रम (BEST) अग्निशमन दल, सार्वजनिक बांधकाम विभागांच्या कोणत्याही अटी व शर्तीचे उल्लंघन आपणाकडून होणार नाही याची काळजी घ्यावी. सबब प्रक्ररणी काही वाद/तक्रार आल्यास याची सर्वस्व जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

१९. या कामाच्या संदर्भात उद्‌भवलेला वाद व दाव्याप्रकरणी प्रथम मुंबई कार्यक्षेत्रातील लवादा मार्फत (आरबीट्रेशन) त्यावरून निवाडा करण्यात येईल. लवादामधील निर्णय असे राहिल्यास मुंबई कार्यक्षेत्रातील न्यायालयाकडे दावा दाखल करता येईल.

२०. वरील कामासंदर्भात कोणत्याही प्रकारच्या माहितीची आवश्यकता असल्यास श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालयात दूरध्वनी क्र. ०२२–२४२२४४३८, ०२२–२४२२२०७२ वर न्यासाचे लिपिक श्री. बाबासाहेब कोरे यांच्याशी संपर्क साधावा.

२१. दरपत्रके स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा तसेच अटी व शर्तीमध्ये काही बदल/सुधारणा करण्याचा/शिथिल करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवला आहे. दरपत्रकधारकाची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

**संपर्क :–**

**श्रीमती. वीणा पाटील, कार्यकारी अधिकारी :– भ्रमणध्वनी ९९३०९४२४२८**

**डॉ. श्री. संदीप राठोड, उप कार्यकारी अधिकारी :– भ्रमणध्वनी ९३२४९९९०९४**

**श्रीमती. ऊज्ज्वला राणे, वित्त व लेखा अधिकारी :– भ्रमणध्वनी ९८२१६००९४१**

(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

2-May-24 4:17 PM 46

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई-४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028
( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

दिनांक : ------------------

# दरपत्रकाचा तपशील

विषय : नविन रेलिंग उभारण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविणेबाबत.

कंपनीचे नाव:------------------------------------------------

कंपनीचा पत्ता: ------------------------------------------------

------------------------------------------------

कंपनी नोंदणी क्रमांक : ------------------------------------------------

जी एस टी क्रमांक : ------------------------------------------------

पॅन कार्ड क्रमांक : ------------------------------------------------

| SR. NO. | PARTICULARS | QTY | RATE RS. | AMOUNT RS. |
|---|---|---|---|---|
| | **NEW RAILING** | | | |
| 2 | SUPPLY OF STAINLESS STEEL (304 QLTY) RAILING WILL MAKE OUT OF 2" DIA X 2"MM THIK TOP, BOTTOM HORIZINAL, 2 SIDE VERTICALS WITH 2 BEND, 2 CONCEALED SLEEVS OF 6" DEEP AND INSIDE VERTICALS – 20 NOS. IN 10' L RAILINGS IN 3' HT BY 1" DIA X 1.5 MM THICK WITH GLOSSY FINISH 10' X 3 ½' - 600 kg<br>SS SLEEVES – 30 NOS<br>SS BENDS – 30 NOS | 12 NOS. | | |
| | | | **GST AMOUNT 18 %** | |
| | | | **INCLUSIVE GST TOTAL AMOUNT** | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

2-May-24 4:17 PM 47

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई-४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028
( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

दिनांक : ____________

## दरपत्रकाचा तपशील

विषय : रेलिंगचे जुने लिवरर्स् (कान) काढून नविन लिवरर्स् बसविण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविणेबाबत.

कंपनीचे नाव:____________

कंपनीचा पत्ता: ____________

____________

कंपनी नोंदणी क्रमांक : ____________

जी एस टी क्रमांक : ____________

पॅन कार्ड क्रमांक : ____________

| SR. NO. | PARTICULARS | QTY | RATE RS. | AMOUNT RS. |
|---|---|---|---|---|
| | **REPAIRS OF SS RAILINGS** | | | |
| 1. | REPLACING LEAVERS OF EXISTING STAINLESS STEEL RALLING (4 NO. IN EACH TALLING) | 170 NOS. | | |
| | | | **GST AMOUNT 18 %** | |
| | | | **INCLUSIVE GST TOTAL AMOUNT** | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

2-May-24 4:17 PM 48